




# बाल बाल देखो

एकदा डोकं हातात दिल्यावर संपूर्ण डोक्यावरचे केस भादरून देणाऱ्या न्हाव्याचं काम चालायचं तांत्रिकपणे. मात्र न्हाव्याची जागा हेअरड्रेसरने घेतल्यापासून या कामात तंत्रासोबत व्हिज्युअल सेन्सही आला आहे. हा व्हिज्युअल सेन्स आणि टेक्निक्स वापरून हेअर कट आणि स्टाइल्सच्या नवनव्या पद्धती येत असतात. या टेक्निक्स आणि आधुनिक केशरचनांची माहिती हेअर ड्रेसर्सना करून देण्यासाठी हेअर इंडिया पीपल (हिप) या संस्थेने 'वेल्ला' या सौंदर्यप्रसाधनांच्या कंपनीच्या मदतीने जुहूच्या जे. डब्ल्यू मेरियटमध्ये नुकत्याच एका कार्यशाळेचं आयोजन केलं होतं.

हेअर कट आणि स्टाइल्सच्या क्षेत्रात गेली २३ वर्षं काम करणाऱ्या सीमा जेरजानी आणि लॅक्मे फॅशन वीकसारख्या (दिल्ली) फॅशन शोमध्ये सहभागी झालेल्या मॉडेल्सची केशरचना करणाऱ्या अनिशा विराणी यांनी या कार्यशाळेत उपस्थित हेअर ड्रेसर्सना हेअर कट आणि स्टाइल्सची प्रात्यक्षिकं



दाखवली. फॅशन शोमध्ये रॅम्पवर चालणाऱ्या मॉडेल्सची किचकट दिसणारी केशरचना नक्की कशा प्रकारे केली जात असेल या आणि अशा हेअर ड्रेसर्सच्या मनातील प्रश्नांना या कार्यशाळेदरम्यान उत्तर मिळालं. सीमा जेरजानी यांनी फणी किंवा ब्रशाचा वापर न करता केवळ बोटांनी केलेली केशरचना उपस्थितांची दाद मिळवून गेली. अगदी सहज-सोप्या पद्धतीने केलेल्या केशरचना पूर्ण झाल्यावर वेगळ्या कशा दिसतात, त्याचा अनुभव उपस्थितांना मिळाला. अनिशा विराणी यांनी हेअर कट करताना काही टिप्सही दिल्या. केस कापण्यापूर्वी त्यांचे वेगवेगळे भाग करणं महत्त्वाचं असतं. एकेका भागाचे केस कापून मग सर्व केस मोकळे करणं केस कापण्याच्या दृष्टीने सोईचं जातं. शिवाय केस कापताना एकाच जागी उभं न राहता केशरचनेप्रमाणे तुमच्या शरीराचीही हालचाल झाली पाहिजे, असं त्या म्हणाल्या.

केसांची रचना करतानाही काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर केशरचना करणं आणि ती रिओपन (म्हणजे सोडवणं) करणं सोपीचं जातं. केशरचनेसाठी कधी कधी १००-१५० पिना लावल्या जातात. त्या काढताना केशरचनेपेक्षाही जास्त वेळ लागतो. मात्र केसांना पिना क्रिस-क्रॉस करून लावल्या तर कमीत कमी पिनांमध्ये केस व्यवस्थित राहतात, असं जेरजानी यांनी सांगितलं. केस फुलवण्यासाठी अनेकदा बॅक कोम्बिंग केलं जातं. मात्र बॅक कोम्बिंग करताना ते सिस्टिमॅटिकली केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत केलं तर ते सहजतेने रिओपन करता येतं.

हेअरकटचा बेस तयार करताना टेक्निक्स वापरली तरी हेअरकटला आकार देताना व्हिज्युअल सेन्स अधिक गरजेचा असतो. एका सरळ रेषेत केस कापण्याचा जमाना मागे पडला आहे. कार्यक्रमात झालेले कट्स न पाहता त्यांच्यासाठी वापरलेली टेक्निक व्यवस्थित अंगिकारिली पाहिजेत यावर दोन्ही हेअर ड्रेसरचं एकमत होतं.

फॅशन शोमध्ये रॅम्पवर चालणाऱ्या मॉडेल्स किंवा पेज थ्रीवरच्या सेलिब्रिटींच्या रंगबिरंगी अशा नवनव्या हेअरस्टाइल्स काही दिवसांत आपल्या आसपास प्रतिबिंबित होताना दिसतात. एका सरळ रेषेत केस कापण्याची पद्धत आता रद्दबातल झालीय, त्याऐवजी तुमच्या चेहऱ्याला, एकूण व्यक्तिमत्त्वाला सूट होतील अशा पर्सनलाइज्ड हेअर कट्सची चलती आहे. असिमिट्रिक, फंकी हेअरस्टाइल्स सध्या इन आहेत.

• प्राजक्ता
prajakta.viva@gmail.com



